ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख १८ मार्च, १९५९ | अंक ११

## विविध माहिती

**कापड गिरणी पुन्हां चालू**—मलबार स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल, गिरणीच्या मालकांनीं मंदीचें कारण दाखवून बंद केल्यानंतर, केरळ सरकारनें ती आपल्या ताब्यांत घेतली होती. गिरणी चालू करण्यासाठी सरकारनें ५ लाख रुपयांचें खेळतें भांडवल पुरविलें आहे. गिरणींत ७५० कामगार काम करीत होते. ते बेकार झाले होते. पण आतां त्यांना कामावर घेण्यांत येईल.

**सायकलींच्या कारखान्यांचें उत्पादन**— भारतामधील सायकलींचे कारखाने दरसाल ९,२५,००० सायकली उत्पादन करूं शकतील. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ८,९५,००० सायकली उत्पादन करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. आतां दरसाल आणखी ७,२४,१०० सायकली उत्पादन करण्यासाठी नवे परवाने देण्यांत आले आहेत.

**सीलोन-चीन व्यापारी करार**—सीलोन व चीन ह्यांच्या दरम्यान ऐनजिनसी अदलाबदलीच्या व्यापारी कराराचीं बोलणीं चालू झालीं आहेत. चीनकडून तांदूळ घेऊन त्याच्या बदला रबर पुरविण्याचा करार करण्यांत येण्याचा संभव आहे. चीनकडून ३,००,००० टन तांदूळ घेण्याचा सीलोनच्या सरकारचा विचार आहे.

**कमी प्रतीच्या कोळशाचा उपयोग**— कमी प्रतीचा कोळसा वापरून पोलादाची निर्मिती करण्याचे प्रयोग जमशेडपूर येथील कारखान्यांत करण्यांत येत आहेत. हे प्रयोग यशस्वी झाले तर छोट्या प्रमाणावर पोलाद उत्पन्न करण्याचे कारखाने काढतां येतील. दक्षिण भारतांत कमी प्रतीचा कोळसा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्यानें त्या भागांत पोलादाचे कारखाने काढण्याच्या दृष्टीनें प्रयोग महत्त्वाचे आहेत.

**टागोरांची जन्मतिथि**—सोव्हिएट पार्लमेंटच्या परदेशीय संबंध कमिटीचे अध्यक्ष मि. मुखडिटनोव्ह ह्यांनीं कलकत्ता येथें बोलतांना असें सुचविलें कीं, कविवर्य रवींद्रनाथ टागोर ह्यांची जन्मतिथि भारत व रशिया ह्यांनीं मिळून साजरी करावी. टागोर ह्यांना रशिआमध्ये काऊंट टॉलस्टॉय ह्यांच्या बरोबरीनें मान देण्यांत येतो, अशी माहिती त्यांनीं सांगितली.

**घरबांधणीसाठी कर्जें**— आयुर्विमा कॉर्पोरेशननें कांहीं विवक्षित उत्पन्न असणाऱ्या मध्यम वर्गातील लोकांना घरें बांधण्यासाठी कर्जे देण्याची जी योजना आंखली आहे तिचा फायदा सरकारी नौकरांखेरीज इतरांनाहि घेता येईल. राज्य सरकारांनी तपशीलवार कार्यक्रम आखून पैशाची मागणी करावयाची आहे. ह्या कामासाठी कॉर्पोरेशन दरसाल ३ कोटी रुपये देणार आहे.

**रेल्वे यार्डांतील गुन्हे**—रेल्वे यार्डांत घडणाऱ्या गुन्ह्यांपासून मालमत्तेचें रक्षण करण्यासाठी कुत्र्यांचा उपयोग करण्यांत येणार आहे. दक्षिण रेल्वेच्या संरक्षणदलांत अशा प्रकारची चार कुत्र्यांची एक तुकडी कामहि करूं लागली आहे. यार्डांत लपून छपून गुन्हे करणाऱ्यांना हुडकून काढण्यांत कुत्र्यांचा चांगला उपयोग होईल, अशी अपेक्षा आहे.

**गणित करणाऱ्या यंत्राची देणगी**— विजेच्या साह्यानें मोठमोठ्या रकमेचीं गणितें करणारें एक यंत्र रशिआनें भारत सरकारला दिलें आहे. ही देणगी संयुक्त राष्ट्र संघटनेमार्फत देण्यांत आली असून ती कलकत्ता येथील आंकडे-शास्त्र-विषयक संस्थेकडे पाठविण्यांत आली आहे. रशिआच्या आर्थिक योजनांच्या कामीं अशा यंत्रांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यांत येतो.

**उत्तर व्हिएटनामला मदत**—उत्तर व्हिएटनाम आणि रशिआ ह्यांच्या दरम्यान मदतीचा एक करार करण्यांत आला आहे. कराराच्या अटींप्रमाणें रशिआ व्हिएटनाम सरकारला बरेच औद्योगिक कारखाने उभारण्याच्या कामीं तांत्रिक व आर्थिक मदत देणार आहे. उत्तर व्हिएटनाममध्यें कम्युनिस्ट सरकार असून दक्षिण व्हिएटनाममध्यें अमेरिकेची सहानुभूति असणारें सरकार अधिकारावर आहे.

**गुप्त हेर खात्याचा खर्च**—ब्रिटिश पार्लमेंटमध्यें देण्यांत आलेल्या अधिकृत माहितीप्रमाणें १९५९-६० च्या आर्थिक वर्षांत ब्रिटनमधील गुप्त हेर खात्यावर ७० लाख पौंड खर्च करावा लागणार आहे. ३१ मार्च, १९५९ अखेर संपणाऱ्या वर्षांत आलेल्या खर्चापेक्षा ही रकम २० लाख पौंडांनीं अधिक आहे. खर्चांत होणाऱ्या वाढीचें कारण सांगण्यांत आलें नाहीं.

**अजंठा लेण्यांचें कौतुक**—रशिआंतून भारतांत आलेल्या सदिच्छा मंडळानें अजंठ्याच्या लेण्यांना भेट दिली. मंडळाच्या पुढाऱ्यांनीं लेण्यांची प्रमाणबद्धता व ती साधण्यांत व्यक्त झालेले गणिताचें ज्ञान ह्यांचें विशेष कौतुक केलें. विशेषतः नक्षीच्या खांबांच्या बाबतींतील प्रमाणबद्धता मंडळाला विशेष कौतुकाहं वाटली.

**जपानची भारताला मदत**—जपानच्या सरकारनें भारताला १ कोटी डॉलर्स कर्ज देण्याचें ठरविलें आहे. जपान, पश्चिम जर्मनी, कॅनडा, ब्रिटन व अमेरिका ह्या भारताच्या धनको राष्ट्रांनीं भारताला द्यावयाची मदत परस्परविचारानें द्यावयाची ठरविलेली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत ह्या देशांकडून भारताला ७० कोटी डॉलर्स मिळणार आहेत.

**बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर**—बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर मि. कॉबाल्ड हे कांहीं दिवसांसाठी दिल्ली येथें आले आहेत. त्यांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआच्या गव्हर्नरांनीं आमंत्रण दिलें होतें. कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील मध्यवर्ती बँकांचे गव्हर्नरहि दिल्लींत येणार आहेत. ह्या गव्हर्नरांच्या बैठकींत पैशासंबंधींच्या प्रश्नावर विचारविनिमय होईल.

**स्वस्त औद्योगिक शक्तीचा शोध**—ब्रिटनमधील शास्त्रज्ञांची एक खास तुकडी स्वस्त औद्योगिक शक्तीचा शोध लावण्याचें कार्य सुरू करणार आहे. शास्त्रीय जगांत " चुंबकीय आरसा " ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या युक्तीच्या द्वारें हा शोध करण्यांत येत आहे. ह्या युक्तींत अखेर पाण्याचा जळणासारखा उपयोग करण्यांत यावयाचा असतो.

**हिंदी आंकडेशास्त्रज्ञाची निवड**—आंध्र प्रदेश सरकारच्या अर्थ व आंकडेविषयक माहितीविभागाचे प्रमुख डॉ. पटनाइक ह्यांची संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या तांत्रिक साह्यमंडळावर वरिष्ठ आंकडेशास्त्र-सल्लागार म्हणून नेमणूक झाली आहे. नेमणूक एक वर्षापुरती असून त्या मुदतींत त्यांनीं फिलिपाइन्स बेटांत काम करावयाचें आहे.

**बोटी बांधण्यास साह्य**— हिंदुस्थान शिपयार्ड पश्चिम जर्मनींतील बोट बांधणाऱ्या एका कंपनीशीं तांत्रिक साह्य मिळविण्याचा करार करणार आहे. कंपनीनें दिलेल्या नमुन्याप्रमाणें बोटी बांधण्यांत यावयाच्या आहेत. अशा प्रकारच्या नऊ बोटी बांधण्यांत येणार आहेत. त्यांची गति शीघ्र असेल आणि त्या सर्व दृष्टींनीं अद्यावत् असतील.

**बुद्धिबळावरील संस्कृत ग्रंथ**— बुद्धिबळें कशी खेळावीं हें दाखविणारें एक सचित्र हस्तलिखित पुस्तक मद्रास सरकारनें पैदा केले आहे. पुस्तकांत बुद्धिबळाच्या डावांचे अनेक नकाशे देण्यांत आले आहेत आणि मराठी भाषेंत सूचनाहि देण्यांत आल्या आहेत. बुद्धिबळांतील निरनिराळया प्याद्यांच्या गतीहि काळजीपूर्वक सांगितलेल्या आहेत.

**इजिप्तला पुस्तकांची भेट**—कैरो येथील भारताचे वकील श्री. आर. के. नेहरू ह्यांनीं इजिप्तच्या राष्ट्रीय ग्रंथालयाला भारतातर्फे १५० पुस्तकांची भेट दिली आहे. भारतीय तत्त्वज्ञान, कला व शिल्प ह्याविषयासंबंधीं हीं पुस्तकें आहेत. इजिप्तबरोबर सहकार्य करण्याच्या व स्नेहसंबंध राखण्याच्या भारताच्या वतीचें प्रतीक म्हणून ती देण्यांत आलीं आहेत, असे उद्गार श्री. नेहरू ह्यांनीं समारंभप्रसंगीं काढले.


## ✱ दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ✱

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :-१० बुधवार पेठ, पुणें २
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )

अध्यक्ष
श्री. ग. रा. साठे

मुंबई शाखा :-८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ... ... | रु. ७,३०,४९० |
| खेळतें भांडवल | ... ... | रु.५८,००,००० |

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½% टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल. बी. मॅनेजर

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान


## ☆ सरदारगृह ☆

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई ३.



## किर्लोस्कर

## अिलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकणू.

आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठी एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारक काम करीत आहेत.

सविस्तर माहितीसाठी लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. १८ मार्च, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


### तेलाच्या शोधासाठी १५ कोटी रुपये

येत्या आर्थिक वर्षांत भारतांत खनिज तेलाच्या शोधासाठी व तेलखाणींचा विकास करण्यासाठी बरीच चालना देण्यांत येणार आहे. ह्या कालांत वरील कामासाठी १५ कोटी रुपयांची रक्कम खर्च करण्यांत येणार आहे. तेल आणि नैसर्गिक वायु मंडळाच्या कामासाठी सर्वांत अधिक रकमेची तरतूद करण्यांत आली आहे. तिचा उपयोग करून, तेल सांपडणाऱ्या भागांचें अधिक संशोधन करण्यांत येणार आहे. खंबायत, ज्वालामुखी, होशिआरपूर व शिवसागर ह्या भागांत आणखी तेल विहिरी खोदण्यांत येतील. पश्चिम बंगालमध्यें तेलाचा शोध करण्यासाठी भारत सरकार आणि स्टँडर्ड व्हक्यूम ह्यांनीं करार केला असून ह्या कामासाठी २·१ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. स्टॅनव्हॅक कंपनीच्या सहकार्यानें तेलाचा शोध करण्याची जी मोहीम सरकारनें आंखली आहे तिचाच एक भाग म्हणून पश्चिम बंगालमधील संशोधन करण्यांत येणार आहे. ऑईल इंडिआ लि. ह्या कंपनींत भांडवल गुंतविण्यासाठी २ कोटी रु. बाजूला काढून ठेवण्यांत आले आहेत. त्याचप्रमाणें, इंडिअन रिफायनरीज लि. कंपनींतहि १·७ कोटी रु. गुंतविण्यांत येणार आहेत. ही कंपनी गोहाटी आणि बरौनी येथें उभारण्यांत यावयाच्या तेलशुद्धीकरणाच्या कारखान्याचें काम पाहणार आहे. ऑईल इंडिआ लि. ही कंपनी तेलाचा शोध करणें, त्याचें उत्पादन करणें व तेलखाणीपासून नळाच्या साह्यानें अशुद्ध तेलाचें वहन करणें, हीं कामें करणार आहे. सरकारच्या भूस्तरविषयक तपासणी खात्यासाठी २·३ कोटी रु. खर्चासाठी मिळणार आहेत. खनिजांच्या शोधाबरोबरच पाटबंधाऱ्यांच्या व पाणीपुरवठ्याच्या कामाचा भूगर्भविषयक अभ्यासहि खात्यानें करावयाचा आहे.

---

### दूरचित्रवाणीचें बोलपटांना व वार्तापटांना आव्हान

अमेरिकेंत दूरचित्रवाणीचा प्रसार घरोघर झाल्यामुळें बोलपटांची निर्मिति किफायतशीर होईल कीं नाहीं, ह्याविषयीं चित्रपटनिर्मात्यांच्या मनांत घोर शंका उत्पन्न झाली होती. पण आतां हॉलिवुडच्या निर्मात्यांनीं चित्रवाणीच्या ह्या आव्हानाला यशस्वीरीत्या तोंड देण्यास सुरवात केली आहे. चित्रवाणीच्या लोकप्रियतेशीं स्पर्धा म्हणून थोडे पण भव्य देखाव्यांनीं भरलेले चित्रपट काढावें अशी त्यांची कल्पना आहे. दिवंगत चित्रपटनिर्माते सेसिल डिमिल ह्यांनीं 'टेन कमांडमेंटस्' सारखे बोलपट काढून जनमनावर मोहिनी घातलेली सर्वांनाच माहीत आहे. त्या चित्रपटांतील ऐश्वर्ययुक्त व भव्य देखाव्यांनीं ज्याप्रमाणें लोक आकृष्ट झाले, तसेंच ते होत राहतील असें मानण्यांत येत आहे. केवळ मनोरंजनासाठी काढण्यांत येणाऱ्या चित्रपटांच्या बाबतींत हा अंदाज खरा ठरण्याचा बराच संभव आहे पण वार्तापटांना मात्र चित्रवाणीनें उखडून टाकल्यासारखें दिसते. एखादी महत्त्वाची घटना झाल्याबरोबर अगदीं थोड्या अवधींत ती चित्रवाणीच्या पडद्यावर घरच्या घरीं पहावयास मिळते. त्यामुळें वार्तापटांची गरजच नाहींशी झाली आहे. ब्रिटनमधील सुप्रसिद्ध रँक संघटनेने आपल्या चित्रपटगृहांतून वार्तापट दाखविण्याचें बंद केलें आहे. ह्या संघटनेच्या मालकीचीं ५०० चित्रगृहें ब्रिटनमध्यें आहेत. १९०८ सालीं ब्रिटिश सरकारनें वार्तापट तयार करणारी संघटना स्थापन केली. त्यानंतर ३० वर्षांनीं 'युनिव्हर्सल न्यूज' ही संस्था वार्तापट काढूं लागली. ह्या दोन्ही संस्था आतां बंद करण्यांत येणार आहेत. भारतांत मात्र चित्रवाणीची सोय नसल्यामुळें वार्तापटांचें महत्त्व चालूच राहील. वार्तापट निर्माण करण्याची मक्तेदारी सरकारकडे आहे व ते दाखविण्याची चित्रपटगृहांवर सक्तीहि आहे.

---

### मिठाची निर्मिति करणारी नवी कंपनी

भारत सरकारनें हिंदुस्थान सॉल्ट कंपनी प्रा. लि. ह्या नांवानें मीठ तयार करणारी एक कंपनी काढण्याचें ठरविलें असून कंपनीच्या भांडवलासाठी २५ लाख रुपयांची तरतूद १९५९–६० च्या अंदाजपत्रकांत केली आहे. पार्लमेंटच्या एस्टिमेटस् कमिटीनें केलेल्या शिफारसींना धरून कंपनीची स्थापना करण्यांत येत असून राजस्थानमधील सांबर आणि डिडवाना येथील मिठाचे कारखाने व मुंबई राज्यांतील खारागोडा येथील मिठाचा कारखाना नवीन कंपनी चालविण्यासाठी घेणार आहे. तथापि फक्त मीठच तयार करून कंपनी थांबणार नाहीं; तर मिठापासून तयार करण्यांत येणारीं रसायनेंहि बनविण्यांत येणार आहेत. खाजगी मालकीच्या मिठागरांकडेहि लक्ष देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. खाजगी मालकीच्या मिठागरांच्या विकासासाठी ९·१९ लाख रुपयांची तरतूद अंदाजपत्रकांत करण्यांत आली आहे. वादळें, पूर अगर इतर नैसर्गिक आपत्तींनीं ज्या मिठागरांची हानि झालेली आहे त्यांची पुनर्घटना करण्यासाठी कर्जे देण्याचीहि व्यवस्था केली आहे. १९५८–५९ सालच्या दुरुस्त अंदाजपत्रकांत सुमारें ३ लाख रु. आणि १९५९–६० च्या अंदाजपत्रकांत ७ लाख रु. ह्या कामासाठी खर्च करण्यांत येणार आहेत. मंडी येथील मिठाच्या खाणींतून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत १० कोटी मण मीठ काढण्यांत यावयाचें होतें. हें लक्ष्य ओलांडण्यांत आलें आहे. ह्या खाणींचें उत्पादन वाढविण्यासाठी एक नवीन योजना आंखण्यांत आली आहे. योजनेप्रमाणे काम चालूं झालें असून ती पूर्ण होण्यास सुमारें १२ लाख रु. खर्च येईल. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सार्वजनिक मालकीच्या व खाजगी मालकीच्या मिठागरांसाठी मिळून १·२८ कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आलेली आहे.

---

**हिंदच्या मंडपाला भेट**—लिपझिग येथें भरविण्यांत आलेल्या औद्योगिक प्रदर्शनांत भारतानें आपला मंडप थाटला आहे. सोव्हिएट पंतप्रधान मि. ख्रुश्चॉव्ह ह्यांनीं मंडपाला भेट दिली. त्यावेळीं इंडो-फॉरेन ट्रेडिंग कॉर्पोरेशनतर्फे त्यांना अक्रोडाच्या लाकडाचीं, रत्नें ठेवण्याची एक नक्षीदार पेटी भेटीदाखल देण्यांत आली.

## युद्धोत्तर कालांतील जर्मनीची आश्चर्यजनक प्रगति

दुसऱ्या महायुद्धांत जर्मनीची अक्षरशः धूळधाण झाली. जर्मनीमध्यें असें एकहि कुटुंब राहिलें नाहीं कीं ज्यांतील एकदोन माणसें युद्धांत दगावलीं नाहींत. कांहीं कुटुंबांचें तर सर्वस्वच गेलें. तरी पण आज पश्चिम जर्मनींत आणि पूर्व जर्मनींत लोक आत्मविश्वासानें अधिक चांगल्या दिवसांची आशा करीत आहेत. विभागल्या गेलेल्या जर्मनीची प्रगति झपाट्यानें होत आहे. पश्चिम जर्मनींतील प्रगति घडाक्यानें होत आहे ह्यांत फारसें आश्चर्य नाहीं. कारण, रूहरसारखा नैसर्गिक साधनसंपत्तीनें भरलेला भाग पश्चिम जर्मनींत आहे. पूर्व जर्मनीला मात्र उद्योग-धंद्याचा असा वारसा लाभलेला नाहीं. तरीसुद्धां तेथील एंजिनिअरांनीं व शास्त्रज्ञांनीं संशोधन करून आहेत तीं साधनें जास्तींत जास्त चांगलीं वापरण्याच्या पद्धति काढल्या आहेत. पूर्व जर्मनींत कोळसा चांगल्या प्रतीचा सांपडत नाहीं. तथापि ह्याच कोळशाचा उपयोग करून उद्योगधंद्याला लागणारी शक्ति पुरविण्यांत येत आहे. विजेचें उत्पादन, रासायनिक कारखाने, लोखंड व पोलादाचे कारखाने ह्या सर्वांसाठी कमी प्रतीच्या कोळशाचाच उपयोग करण्यांत येतो. पश्चिम जर्मनींत दरडोई वापरण्यांत येणाऱ्या विजेपेक्षा अधिक वीज पूर्व जर्मनींत वापरण्यांत येते. तीच स्थिति मांस, साखर, लोणी, इत्यादि पदार्थांबाबत आहे. तेथील अर्थव्यवस्था नियोजित आहे आणि वस्तूंच्या किंमती हळुहळु खाली येत आहेत. १९६१ सालापर्यंत उत्पादनाच्या बाबतींत पश्चिम जर्मनीलाहि मागें टाकण्याची उमेद पूर्व जर्मनी धरीत आहे, आणि ह्याचा परिणाम म्हणून पश्चिम जर्मनींतील उद्योगधंदेहि उत्पादन वाढविण्याची कोशीस करीत आहेत.

## परदेशांत शिक्षण घेणारे भारतीय विद्यार्थी

उच्च शिक्षणासाठी परदेशांत जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यां-पैकीं सर्वांत अधिक विद्यार्थी ब्रिटनला जातात. सध्यां भारता-मधून परदेशांत गेलेल्या विद्यार्थ्यांपैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थी इंग्लंडमध्यें ह्या ना त्या प्रकारचें उच्च शिक्षण घेत आहेत. अशा विद्यार्थ्यांची संख्या ३,८५० आहे. इंग्लंडच्या खालोखाल अमेरिकेंत २,८४८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या इतर देशांच्या मानानें अधिक असणें स्वाभाविक आहे. इंग्रजी भाषेचा सराव हेंच ह्याचें कारण होय. भारतामध्यें उच्च शिक्ष-णाचें माध्यम इंग्रजी असल्यानें विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा प्रचलित असणाऱ्या देशांत पुढील अभ्यास करणें सुलभ जातें. शिवाय भारतावर इंग्रजांचें अधिराज्य दीर्घकाल असल्यामुळें ब्रिटिश विद्यापीठांच्या पदव्यांना अर्थातच मानाचें स्थान होतें. सरकारी व निमसरकारी संस्थांमधून वरच्या श्रेणीच्या जागा भरावयाच्या असल्यास ह्याच पदव्या उपयोगी पडत असत. अजूनहि ह्या परिस्थितींत विशेष फरक पडलेला नाहीं. अमेरिकेंत जाणारे बहुतेक हिंदी विद्यार्थी शास्त्रीय अगर तांत्रिक विषयांचा अभ्यास करीत आहेत. त्यांपैकी ६८२ विद्यार्थ्यांना सरकारी अगर परदेशांच्या शिष्यवृत्त्या मिळालेल्या आहेत. १३५ विद्यार्थी ब्रिटनमधील शिष्यवृत्त्या मिळवून तेथें अभ्यास करीत आहेत. ब्रिटन व अमेरिकेच्या खालोखाल पश्चिम जर्मनीमध्यें ४८३ हिंदी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कॅनडामध्यें १०५ हिंदी विद्यार्थी शिकत आहेत. रशियामध्यें अवघे १३ हिंदी विद्यार्थी व चीन-मध्यें अवघे १० हिंदी विद्यार्थी शिकत आहेत. रशिअन अगर चिनी भाषा शिकण्यास फारशी सोपी नाहीं. भाषेच्या अडचणी-मुळें ह्या देशांत शिकणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांची संख्या थोडी असणें स्वाभाविकच आहे. क्यूबामध्यें १ हिंदी विद्यार्थी आहे.

## खंडसारी साखरेवरील कराचा परिणाम

मध्यवर्ती सरकारनें खंडसारी साखरेवर दर हंड्रेडवेटमागें वट ६·३० रु. कर घेण्याचें ठरविलें आहे. ह्या करांत ५·६० रुपये मूळ अबकारी कर असून ७० नये पैसे विक्रीकराऐवजीं घेण्यांत येणार आहेत. आतांपर्यंत खंडसारी साखरेवर कर नसल्यामुळें उसाला जास्ती किंमत देऊनसुद्धां साखर तयार करणें खंडसारी साखर कारखान्यांना फायद्याचें होत असे. त्यामुळें मोठ्या कारखान्यांमधून तयार होणाऱ्या साखरेशीं खंडसारी साखर स्पर्धा करीत होती. गेल्या एकदोन वर्षांत खंडसारी साखरेचें उत्पादन वाढत चाललें होतें. दरसाल सरासरी १,००,००० टन खंडसारीचें उत्पादन होत असे, तें गेल्या हंगामांत ३,००,००० टनांपर्यंत वाढलें. खंडसारी साखरेचे कारखाने मुख्यतः उत्तरप्रदेशांत आहेत. त्यामुळें साखरेच्या मोठ्या कारखान्यांतील उत्पादनावर परिणाम झाला. पश्चिम उत्तरप्रदेशांत १९५७–५८ च्या हंगामांत १,३०,००० टन साखरेचें उत्पादन करण्यांत आलें होतें. १९५८–५९ च्या हंगामांत ३४,००० टन साखरेचेंच उत्पादन होऊं शकलें. खंडसारी साखरेच्या धंद्याला करांच्या बाबतींत सवलत देण्याचें सरकारचें धोरण होतें. पण मोठ्या कारखान्यांत तयार होणाऱ्या साखरेवरील कर दर मणामागें १३ रु. करण्यांत आल्यापासून ह्या सवलतीचा दुष्परिणाम होऊं लागला आणि करापासून मुक्त असलेली खंडसारी साखर तयार करण्याकडे लोकांचा कल झुकूं लागला. अर्थातच मोठ्या कारखान्यांना ऊस कमी पडूं लागला म्हणून साखरेच्या मोठ्या कारखान्यांनीं खंडसारी साखरेवर कर बसविण्याची मागणी केली होती. आतां हा कर बसविण्यांत आल्यामुळें मोठ्या साखर कारखान्यांना एक प्रकारचें अप्रत्यक्ष संरक्षणच मिळाल्यासारखें झालें आहे. त्यामुळें चालू हंगामांत साखर कारखान्यांतील उत्पादन वाढण्याचा बराच संभव आहे. खंडसारी साखरेचें उत्पादन साखर कारखान्यांच्या आसमंतात करण्यांत येऊं नये, ही मागणीहि उत्तरप्रदेश सरकारनें मान्य केली आहे.

## भोर स्टेट बँक लिमिटेड, भोर

३१ डिसेंबर १९५८ असेरच्या व्यवहारांत बँकेस निव्वळ नफा रुपये ४,८२१ झाला आहे. यामध्यें मागील सालचा शिल्लक राहिलेला नफा रुपये १५८ मिळवितां एकूण नफा रुपये ४,९७९ पुढीलप्रमाणें वांटावा अशी संचालक मंडळाची शिफारस आहे. रिझर्व्ह फंडाकरतां तरतूद रु. १,२००, इन्कमटॅक्सकरतां तरतूद रु.१,६००, बुडीत व संशयित कर्जांकरतां तरतूद रु.२,००० पुढील सालीं शिलकी नफा ओढणें रु. १७९, एकूण रुपये ४,९७९

बोर्डानें चालू सालीं भागावरील फायदा न वांटण्याचें ठरविलें आहे. भोर येथील बँकेच्या इमारतीमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडीचे सोयीचा स्थानिक खातेदार चांगला उपयोग करून घेत आहेत. गोडाऊनची जी सोय केली आहे, त्याचाहि स्थानिक व्यापारी व खातेदार यांनीं शक्य तितका उपयोग करून घ्यावा. भोर व शिरवळ येथें हल्लीं गोडाऊनचा व्यवहार थोड्या प्रमाणांत होत असतो. त्याचाहि स्थानिक व्यापारी वर्गानें जरूर तो फायदा घ्यावा, अशी बोर्डाची विनंती आहे.

## बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची वार्षिक सभा

### ताळेबंदांतील आंकड्यांवरून अध्यक्षांनीं घेतलेला आढावा

[ महाराष्ट्र बँकेच्या भागीदारांची चोविसावी वार्षिक साधारण सभा गुरुवार दि. ५ मार्च, १९५९ रोजीं भरली होती. त्यावेळीं, अध्यक्ष, श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांनीं सर्वसाधारण आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतला व त्या पार्श्वभूमीवरून बँकेच्या प्रगतीचें सिंहावलोकन केलें. त्यांतील महत्त्वाचा भाग येथें देत आहों. ]

सर्व पार्श्वभूमीवरून पाहतां आपले बँकेचे व्यवहारांची फलश्रुति अत्यंत समाधानकारक असल्याचें दिसून येईल. अहवालाचे वर्षी आपले ठेवींत २ कोटी, ७० लक्ष रुपयांची म्हणजे १९५७ अखेरचे ठेवींचे १/३ पेक्षाहि थोडी अधिकच वाढ झाली. अहवालाचे वर्षी बँकेनें एकूण सहा नवीन शाखा उघडल्या. आतां शाखांची संख्या ४१ झाली असून त्या सर्वांचे व्यवहार समाधानकारकपणें चालू आहेत. या वर्षी आपले ठेवींचे एकूण ६४ टक्के रक्कम ही रोकड, रिझर्व्ह बँकेकडील शिल्लक व गुंतवणूक या स्वरूपांत होती. अहवालाचे वर्षी भागांवरील मागविलेल्या कॉल्समुळें आपलें वसूल भांडवल ६ लक्ष, १५ हजार रुपयांनीं वाढून तें २५ लक्ष, २२ हजार रुपयांवर गेलें आहे. राहिलेले दोन कॉल्स मागविल्यावर तें आणखी वाढून त्याचें प्रमाण ठेवींचे प्रमाणाशीं रास्त असें होईल. आपले अनुमतीनें आपलें संचालक मंडळ प्रतिवर्षीचे नफ्यांतून अधिकांत अधिक रक्कम गंगाजळींत टाकीत असल्यामुळें आपली गंगाजळी आतां १३ लक्ष रुपये झाली आहे. हेंच धोरण पुढेंहि अवलंबिलें जाईल असा मला विश्वास आहे व त्यामुळें बँकेच्या नांवांतच सूचित कार्यक्षेत्रांत सेवा करण्यास बँक पूर्ण समर्थ होईल.

#### उत्पन्न-खर्चाच्या बाबी

अहवालाचे वर्षी ठेवींतील वाढीमुळें दिलेल्या व्याजाचे रकमेंत ६ लक्ष, ५६ हजार रुपयांची वाढ झाली आहे. नवीन शाखा व धंद्याचा वाढता व्याप यामुळें वाढलेला नोकरवर्ग, वार्षिक पगारवाढ व महागाईभत्त्यांतील वाढ, यामुळें नोकरवर्गावरील खर्चांत २ लक्ष ७१ हजार रुपयांची वाढ झाली आहे. इतर बाबींत विशेष उल्लेख करण्यासारखी वाढ क्वचितच झाली आहे. कमिशन, हुंडणावळ व दलाली वगैरे बाबींपासूनच्या उत्पन्नांत या वर्षी १ लक्ष, ३९ हजार रुपयांची वाढ झाली आहे. या प्रकारच्या व्यवहारांत झालेली वाढ ही निश्चित समाधानकारक आहे. ठेवींवर दिलेल्या व्याजाचें प्रमाण १९५६ मध्यें १·६ टक्के होतें तें २·१ टक्क्यांवर आलें आहे. ही वाढ होण्याचें कारण म्हणजे आपल्या ठेवींतील बराचसा भाग मुदतीच्या ठेवींच्या स्वरूपांत आहे, हें होय. पण व्याजाचे दरांचे प्रमाणांत वाढ झाली असली तरी मिळालेल्या ठेवींची संचालक मंडळ योग्यप्रकारें व कुशलतेनें गुंतवणूक करीत आहे हें जिंदगीचें तरतेपणाचें वाढतें प्रमाणावरून व वाढलेल्या नफ्यावरून आपले निदर्शनास येईल.

नफ्याचे वांटणीचे बाबतींत आपलें संचालक मंडळाचें धोरण प्रथमापासूनच सावधानतेचें व डिव्हिडंड वाढविण्यापेक्षा गंगाजळी भक्कम करण्याचें आहे. या धोरणाशीं सुसंगत राहून व वाढत्या नफ्याचें प्रमाण लक्षांत घेऊन आपले भाग-भांडवलावर आपणांस योग्य असा मोबदला देण्याचा प्रयत्न संचालक मंडळ नेहमींच करीत आलें आहे. या धोरणास अनुसरूनच या वर्षी डिव्हिडंडचा दर वाढवून तो ६ टक्क्यांऐवजीं ६॥ टक्के (करमाफ) करण्यास संचालक मंडळ उद्युक्त झालें आहे.

बँक ॲवॉर्डचे तरतुदींप्रमाणें आपली बँक लवकरच 'क' वर्गातून 'ब' वर्गात जाणार आहे. हें वर्गान्तर होतांना नोकरवर्गास कांहीं वेतनवाढ द्यावी लागणार आहे. ही वाढ एका वर्षात देण्याऐवजीं वर्गान्तर होण्यासाठी दिलेल्या दोन वर्षे मुदतीचे संक्रमणावस्थेचे काळांत विभागून करावी किंवा काय, याचा संचालक मंडळानें साकल्यानें विचार केला. पण कांहीं कायदेशीर अडचणी निर्माण होण्याचा संभव वाटल्यावरून तो विचार त्यांना सोडून द्यावा लागला. सध्यांचे ॲवॉर्डची मुदत ३१ मार्च १९५९ अखेर संपत आहे व त्या जागीं येणाऱ्या नवीन व्यवस्थेची आम्हीं प्रतीक्षा करीत आहोंत. नोकरवर्गानें निष्ठेनें व चांगल्याप्रकारें काम केल्याबद्दल संचालक मंडळ त्यास धन्यवाद देत आहे. त्यांची स्थिति सुधारणेच्या आवश्यकतेची जाणीव संचालक मंडळास नेहमींच असते. त्या अनुषंगानें यावच्छक्य ते प्रयत्न आम्हीं नेहमींच करीत असतों व पुढेंहि करूं. परंतु त्यासाठीं त्यांनीं थोडा धीर धरावा, अशी माझी विनंती आहे.

#### लायक अधिकारी व नोकरवर्ग

बँकेच्या विस्तारासाठी शैक्षणिक पात्रता असलेला, अनुभवी व संचालक मंडळाचे धोरणाशीं पूर्ण परिचित असलेला असा निष्ठावान नोकरवर्ग ही सर्वप्रथम आवश्यक बाब आहे. म्हणून अधिकाराचे जागांसाठी आवश्यक तो नोकरवर्ग आपल्या बँकेंतील लोकांतूनच शिकवून तयार करण्याचें संचालक मंडळाचें धोरण व पद्धत आहे. या धोरणास अनुसरून रिझर्व्ह बँकेनें चालविलेल्या बँकर्स ट्रेनिंग कॉलेजला बँक दरवर्षी दोन-तीन अधिकारी शिक्षणासाठी पाठवीत असते. याशिवाय बँकेनेंहि गतवर्षापासून हेड ऑफिसचे ठिकाणीं अधिकारीवर्गाचे कामाचे प्रत्यक्ष व पुस्तकी शिक्षण देण्यासाठी खास सोय केलेली आहे. पण शिक्षणक्रम पूर्ण होऊन त्यांतून अधिकारीवर्गाला योग्य अशीं माणसें तयार होण्यासाठी स्वाभाविकच कांहीं कालावधि लागणार व म्हणून सध्यां हातीं घेतलेल्या विस्ताराचे कार्यक्रमासाठी कांहीं अधिकारी बाहेरून घेणें संचालक मंडळास भाग पडलें. मात्र अशी माणसें घेतांना बँकेंत असलेल्या त्यांच्या पात्रतेच्या व अनुभवाच्या माणसांवर अन्याय होणार नाहीं, याची दक्षता घेण्यांत आली आहे. बँकेची प्रगति शीघ्र गतीनें होत आहे, व ज्यांनीं बँकेंत आजवर निष्ठेनें व आपुलकीनें काम केलें आहे त्यांस पुढील काळांत संधि मिळण्याचे बाबतींत नाउमेद होण्याचें कारण नाहीं.

#### औद्योगिक प्रगतीस सहाय्य

कांहीं बँकांनीं चैनीच्या वस्तु खरेदी करण्यासाठी कर्जे देण्याची काढलेली टूम मला पसंत नाहीं. त्यामुळें चलनवृद्धि वाढण्यास मदत होणार आहे. बँकांनीं लहान लहान उद्योगधंद्यांचे स्थापनेस व वाढीस मदत केली पाहिजे. त्या दृष्टीनें आपले बँकेनें गेल्या २० वर्षांत केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. महाराष्ट्रांत नजीकचे भविष्य काळांत औद्योगिक प्रगतीस मुबलक वाव आहे व त्यांत बँकांना महत्वाची कामगिरी करावयाची आहे. केवळ कर्जें देणें एवढेंच बँकांचें कर्तव्य नाहीं. त्यांनीं आपल्या ग्राहकांस उद्योगधंद्यासंबंधीं उपयुक्त माहिती देणें व मार्गदर्शन करणें अगत्याचें आहे. आपलें बँकेचें महाराष्ट्रांतील स्थान लक्षांत घेतां, तिनें अशी माहिती देणारें खातें सुरू करण्याचे दिशेनें प्रयत्न करावेत असें मला वाटतें. आपली बँक महाराष्ट्रांत निघणाऱ्या नवीन उद्योगधंद्यांना शक्य तें आर्थिक साहाय्य करील.

**लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनची शेअर्स घेण्याची पद्धति**

लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशननें गेल्या वर्षांत कांहीं काळ, दलालांनीं स्वतः होऊन सादर केलेल्या कांहीं योजनांचा (ऑफर्स) विचार करून भांडवल गुंतविलें. तथापि असें करणें कॉर्पोरेशनच्या हितसंबंधांचा विचार करतां योग्य नसल्यानें, या कॉर्पोरेशननें आतां आपल्या जबाबदारीवर दलालांकडून ठराविक किंमतीस ठराविक शेअर्स स्वतः खरेदी करण्यास प्रारंभ केला आहे. त्याचप्रमाणें, दलालांनीं देऊं केलेल्या दरांनीं शेअर्स घेण्यावरहि पात्रतेनुसार विचार होतो.

---

**महात्माजींच्या ग्रंथांचे कानडी अनुवाद**—महात्माजींच्या ग्रंथांच्या कानडी अनुवादमालेपैकी ४ था व ५ वा खंड म्हैसूरच्या सरकारनें नुकताच प्रकाशित केला आहे. हीं पुस्तकें गांधी स्मारक निधीनें नवजीवन ट्रस्टच्या मदतीनें तयार केलीं आहेत. प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचीं नांवें "सत्य व अहिंसा" आणि "धर्म व नीति' अशीं आहेत.

**युरेनिअमच्या संस्करणाचा कारखाना**—भारताच्या अणुशक्ति मंडळानें बिहारमध्यें युरेनिअमच्या खनिजावर संस्कार करण्याचा कारखाना काढण्याचा विचार चालविला आहे. कारखान्यांत प्रारंभीं रोज ५०० टन अशुद्ध युरेनिअम संस्कारित होईल व नंतर त्याच्या दुप्पट होईल. कारखाना बांधण्यास २ कोटी रुपये लागतील. तो बांधून पुरा होण्यास तीन वर्षे लागतील.

**खंडसारी साखरेवरील कर**—१९५९–६० च्या मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकांत खंडसारी साखरेवर नव्यानें कर बसविण्यांत आला आहे. खंडसारी साखरेच्या दर पोत्यावर आतां १६·८० रुपये कर द्यावा लागेल. श्रीरामपूर भागांत खंडसारी साखरेचे दोन कारखाने निघालेले आहेत. त्यांत दररोज १०० पोतीं साखर तयार होते. कारखानदारांच्या मतानें खंडसारीवरील कर फार आहे.

**फ्रान्स अग्निबाण सोडणार**—फ्रान्सच्या संरक्षण खात्यानें असें जाहीर केलें आहे कीं सहारामधील तळावरून फ्रेंच तंत्रज्ञ अग्निबाण सोडणार आहेत. हे अग्निबाण हवेच्या वरच्या थरांचें शास्त्रीय संशोधन करण्यासाठीं उपकरणांसहित सोडण्यांत येतील. तज्ज्ञांच्या मतानें अग्निबाण पृथ्वीपासून १५ मैल उंचीपर्यंतचा पल्ला गाठूं शकतील. अणुसंशोधनाच्या बाबतींत लवकर प्रगति करण्याची फ्रान्सची धडपड चालू आहे.

**फौंटनपेनच्या निर्यातीला वाव**—मद्रास येथें भारत व जपान ह्यांच्या सहकार्यानें काढण्यांत आलेला फौंटनपेन्सचा कारखाना दरमहा ३०,००० पेन्स तयार करतो. पण त्यांत दरमहा ५०,००० पेन्स तयार होऊं शकतील. सध्यां ह्या धंद्यासाठीं लागणाऱ्या कच्च्या मालापैकीं ४० टक्के माल आयात करावा लागतो. हिंदी फौंटनपेन्सना पूर्व आफ्रिका, पश्चिम आशिया, मलाया, इत्यादि देशांत बाजारपेठ मिळण्यासारखी आहे.

**गंधक तयार करण्याचा कारखाना**—गंधक व सल्फ्युरिक ॲसिड तयार करण्याचा एक कारखाना बिहारमध्यें काढण्याचा विचार नॅशनल इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनतर्फे चालू आहे. कारखान्यासाठीं लागणारा कच्चा माल बिहारमध्यें उपलब्ध आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं २·५ कोटी रुपये खर्च येईल. गंधकाच्या उत्पादनाला दर टनामागें २८·६ रुपये खर्च येईल.


स्थापना १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

**[ शेड्यूल्ड बँक ]**

हेड ऑफिस–*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन*, सातारा शहर.

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, बार्शी, नासिक, लोणंद, कोल्हापूर, हलकर्णी, इचलकरंजी व फलटण.

लौकरच मुंबई दादर भागांत शाखा सुरू करणेंत येत आहे.

ता. ३०-६-५८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ४,१५,००० |
| ठेवी | रु. | १,३१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५१,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० |

दहा अगर अधिक वर्षे रु. ४·००

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २·५० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०·५० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एल्एल्. बी., चेअरमन



## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१.

( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

**भरपाई झालेलें भाग भांडवल :**

भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष

मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष

रु. १ कोटी, २५ लक्ष

**गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष**

**एकूण ठेवी : रु. १२ कोटी**

**खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर**

**१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा**

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड

मॅनेजिंग डायरेक्टर.

## सहकारी कायदा-दुरुस्ती उपसमिति

### अडचणी कळवा व सूचना पाठवा

महाराष्ट्र विभाग काँग्रेस कमिटीच्या आर्थिक व राजकीय संशोधन विभागातर्फे श्री. बापूसाहेब गुप्ते यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी कायदा दुरुस्ती उपसमिति नियुक्त झाली आहे. या उपसमितीची बैठक दिनांक ६ मार्च १९५९ रोजीं सायंकाळीं काँग्रेस-भवनांत भरली होती. त्यावेळीं सर्वसाधारण प्राथमिक चर्चा होऊन सुधारणा सुचविण्यासाठीं कोणता दृष्टिकोन ठरवावा व काय धोरण ठेवावें यावर विचारविनिमय झाला. ( १ ) सर्विस को-ऑपरेटिव्हज, ( २ ) को-ऑपरेटिव्ह फार्मिंग व ( ३ ) इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्हज या तीनहि प्रकारच्या सोसायट्या स्थापन करतांना सध्यांच्या कायद्यामुळें काय काय अडचणी येतात व प्रत्यक्षांत त्याचा काय अनुभव येतो यासंबंधीं साधार माहिती मोठ्या प्रमाणावर जमवावी व त्या अनुरोधानें सुधारणा सुचवाव्या असें ठरलें. सध्यांच्या कायद्यांत वरील सर्व प्रकारच्या सोसायट्या काढण्याला पूर्ण वाव आहे, कायद्याचीं कलमें सुधारण्यापेक्षा त्यांच्या अंमलबजावणीसंबंधीं असलेले नियम सुधारणें व जुन्या प्रथा मोडणें जास्त आवश्यक आहे, असा एक दृष्टिकोन मांडण्यांत आला. रजिस्ट्रारला जरूरीपेक्षा जास्त अधिकार आहेत त्यावर कांहीं बंधनें घालतां येतील कां, ते अधिकार कमी करणें इष्ट व आवश्यक आहे कां, सोसायट्यांना जास्त स्वायत्तता देणें जरूर आहे कां, वगैरेसंबंधीं खुलासेवार चर्चा व्हावी; लोकांना व या क्षेत्रांतील कार्यकर्त्यांना प्रत्यक्षांत येत असलेले अनुभव व सोसायट्या रजिस्टर करतांना व त्यानंतर त्या चालवतांना येणाऱ्या अडचणी यांची पहाणी करावी व मगच उपसमितीनें आपल्या सूचना कराव्या असें ठरलें.

महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांना या क्षेत्रांत येत असलेले अनुभव व अडचणी आणि त्यावरील त्यांना आवश्यक वाटणाऱ्या सुधारणा त्यांनीं सुचवाव्या अशी त्यांना विनंती आहे.

पत्रव्यवहार : द. वा. फडके, संघटक, आर्थिक व राजकीय संशोधन विभाग, काँग्रेस भवन, पुणें नं. ५ या पत्त्यावर करावा.

---

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

### ६% करमाफ डिव्हिडंड

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा, ह्या बँकेस १९५८ सालीं करासाठीं ५८,०५२ रु. ची तरतूद करून ८५,७३७ रु. नफा झाला. रिझर्व्ह फंडाकडे ३०,००० रु. वर्ग करून, इनव्हेस्टमेंट डिप्रिसिएशन रिझर्व्ह फंडांत २,००० रु. घालून, स्टाफला १४,००० रु. बोनस देऊन भागदारांना ६% करमाफ डिव्हिडंडसाठीं ३९,००० रु. चा विनियोग करण्यांत येईल. ह्याप्रमाणें नफ्याचा विनियोग केल्यानंतर बँकेचा रिझर्व्ह फंड ३,००,००० रु. होईल आणि इन्व्हेस्टमेंट डिप्रिसिएशन रिझर्व्ह १,७५,००० रु. होईल. म्हणजे, बँकेच्या इन्व्हेस्टमेंटमधील रोख्यांची कमी झालेली किंमत पूर्णपणें भरून निघाली आहे. बँकेनें अहवालाचे वर्षी इचलकरंजी व फलटण येथें शाखा उघडल्या; आतां बँकेच्या शाखांची संख्या १० झाली आहे. बँकेकडील ठेवी १,२७,३२,५४२ रु. च्या १,४९,९५,५०९ रु. वर गेल्या आहेत. बँकेचें उत्पन्न सुमारें एक लक्ष रुपयांनीं वाढलें आणि वाढलेल्या धंद्याचा व इतर खर्च भागवून नफाहि वाढला. अशा रीतीनें युनायटेड वेस्टर्नची प्रगति भक्कम पायावर होत आहे. बँकेची वार्षिक सभा २८ मार्च रोजीं आहे.

## इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनचा इशारा

इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष मि. हॅडफील्ड ह्यांनीं संघटनेच्या वार्षिक सभेपुढें बोलतांना साखर-कारखान्यांच्या अडचणींचा उल्लेख केला. ते म्हणाले कीं, देशांतील साखरेचें उत्पादन घटत आहे. १९५६-५७ सालीं २०.२ लाख टन साखर निर्माण करण्यांत आली. १९५७-५८ सालीं १९.७५ लाख टन उत्पादन झालें व १९५८-५९ सालीं तें आणखी कमी होण्याची शक्यता आहे. साखर-कारखान्यांना अनेक अडचणींना सध्यां तोंड द्यावें लागत आहे. साखरेच्या जास्तींत जास्त किंमती ठरविण्यांत आल्या आहेत. पण किमान किंमतीची मात्र ग्वाही दिलेली नाहीं. ग्राहक साखरेसाठीं ज्या किंमती देतात त्यांचा कारखान्यांच्या जागेवरील किंमतीशीं मेळ घालण्याची पुरेशी व्यवस्था नाहीं. खंडसारी साखरेची स्पर्धा आहेच. त्याशिवाय सहकारी साखर कारखान्यांकडूनहि अन्याय्य स्पर्धा होण्याची शक्यता आहे. सहकारी कारखान्यांचा विस्तार करण्याचें सरकारचें धोरण आहे. पण हें धोरण असेंच चालूं राहिलें तर खाजगी मालकीच्या कारखान्यांना अपुरा नफा होऊं लागेल व त्यामुळें सरकारला मिळणाऱ्या कराच्या उत्पन्नांतहि घट होऊं लागेल. सहकारी कारखान्यांची नियोजित स्थापना पूर्ण झाली म्हणजे साखरेच्या एकूण उत्पादनापैकी १५ टक्के उत्पादन त्या कारखान्यांकडून होऊं लागेल. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत साखरेच्या उत्पादनाचें उद्दिष्ट दरसाल २५ लाख टन ठरविण्यांत आलें आहे. पण तें गांठतां येईल कीं नाहीं ह्याविषयीं शंका उत्पन्न झाली आहे. साखरेच्या कारखान्यांत नवी यंत्रसामुग्री बसविण्याची फार गरज आहे. भारतामधील साखरेचे कारखाने तांत्रिक दृष्ट्या मॉरिशस, जाव्हा इत्यादि देशांतील कारखान्यांच्या बरोबर आहेत; फक्त त्रिनिदादमधील कारखाने मात्र पुढें आहेत.

---

## जनता सहकारी बँकेची 'हप्तेबंद अल्पबचत सर्टिफिकिट योजना'

जनता सहकारी बँक लि. नें सुरू केलेल्या "हप्तेबंद अल्पबचत सर्टिफिकेटस् खरेदी"च्या योजनेचें उद्घाटन मुंबई राज्याचे बांधकाममंत्री ना. बाळासाहेब देसाई, बी. ए., एलएल. बी. यांच्या हस्तें रविवार दिनांक १५-३-५९ रोजीं दुपारीं ४ वाजतां पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणेंच्या सभागृहांत झालें.

---

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.
भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिट यांची वसुली माफक दरानें केली जाते.
शाखा : फोर्ट, दादर, माहिम, पार्ली, पुणे, बेळगांव
मुख्य शाखा : सारस्वत बँक गृह, गिरगांव, मुंबई ४.

## जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स, लि., दांडेकरवाडी, भिवंडी

३० जून, १९५८ अखेर संपलेल्या वर्षी घसाऱ्यासाठी रु. ३६,७६९, व्यवस्थापकांना ( मॅनेजिंग एजंटसना ) वेतन म्हणून रु. २०,२५०, व कामगार, नोकरवर्ग व कंत्राटदार यांना बोनस देण्यासाठी रु. ३२,०००, ( मागील वर्षाची बोनसची रक्कम रु. २१,०००, होती. ) एवढी तरतूद केल्यानंतर कंपनीचा व्यवहार रु. १,८४,३९१ चा नक्त नफा दाखवितो. मागील वर्षाची पुढें ओढलेली रक्कम रु. ७५० यांत मिळविल्यानंतर वाटतां येण्याजोगी नक्त नफ्याची रक्कम रु. १,८५,१४१ होते. ही रक्कम पुढीलप्रमाणें विभागण्यांत आली आहे :—

| | | |
|---|---|---|
| प्राप्तिकर ( इन्कम टॅक्स ) निधीस | रु. | १,००,००० |
| लाभांश ( डिव्हिडंड ) निधीस | रु. | ६८,००० |
| निवृत्ति–वेतन ( ग्रॅच्युइटी ) निधीस | रु. | १०,००० |
| विकास सूट (डेव्हलपमेंट रिबेट) निधीस | रु. | ५,१८० |
| सर्वसाधारण निधीस | रु. | ८१६ |
| व पुढील वर्षाकरितां बाकी ओढली | रु. | १,१४५ |
| | रु. | १,८५,१४१ |

लाभांश फंडांतून खालीलप्रमाणें डिव्हिडंड देण्यांत आलें:—

| | | |
|---|---|---|
| ५% प्रेफरन्स शेअर्सवर ( प्राप्तिकरपात्र ) | रु. | ३,४२५ |
| १०% सर्वसाधारण शेअर्सवरील भरलेल्या रकमेवर ( प्राप्तिकरमुक्त ). | रु. | ६४,७२० |
| | रु. | ६८,१४५ |

अहवालाचे वर्षी विक्रीमध्यें मागील वर्षापेक्षा सुमारें तीन लक्ष रुपयांची वाढ झाली असल्यामुळें नक्त नफा सुमारें चाळीस हजार रुपयांनीं वाढला आहे. त्यामुळें साधारण भागपत्रकावरील लाभांश ९% वरून १०%, व कामगार, नोकरवर्ग व कंत्राटदार ह्यांचे बोनसमध्यें त्यांनीं मिळविलेल्या वार्षिक मूळ पगाराच्या १/५ वरून १/४ पर्यंत वाढ करणें शक्य झालें आहे.

मागील वर्षी अपेक्षा केल्याप्रमाणें पोलाद भट्टीचें उत्पादन चालू वर्षी अंदाजें रु. ८०,०००, तें अंदाजें रु. १,१०,००० पर्यंत वाढलें आहे. भावी काळांत अधिक प्रगतीची अपेक्षा आहे.

भारत सरकारनें खालील मशिन टूल्स बनविणेसाठी कारखान्यास परवाना दिला आहे.

( १ ) शेपिंग मशिन्स ( २ ) हॅक-सॉ मशिन्स (५" व ९") ( ३ ) कोन-पुली लेथ्स ( ४ ) सहा टन पर्यंतचें हैड्रॉलिक जॅक्स. २१" गियर्ड शेपिंग मशिनचा नमुना तयार झाला आहे.

कंपनीचें वसूल भांडवल ७,११,४२७ रु. असून रिझर्व्ह व इतर फंड २,२२,६३४ रुपयांचे आहेत. ठेवी फक्त २७,५१८ रु. च्या असून कंपनीच्या एकूण १५ लक्ष रु. खेळत्या भांडवला-पैकी २ लक्ष, ७० हजार रुपये रोख व बँकांत ठेव म्हणून आहेत. कंपनीनें २ लक्ष, ८२ हजार रु. सरकारी रोख्यांत गुंतवलेले आहेत.

## सुती कापड गिरण्यांना लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची आयात

### अर्ज स्वीकारण्याची मुदत वाढली

सुती कापड निर्यात विकास योजनेनुसार सुती कापड किंवा धागा अगर दोन्हींहि वस्तू निर्यात करणाऱ्या गिरण्यांना लाग-णारी यंत्रसामग्री ( स्वयंचलित भाग वगळून ) आयात करण्या-साठी द्यावयाच्या आयात परवान्यांचे अर्ज स्वीकारण्याची मुदत २८ फेब्रुवारी, १९५९ वरून ३० सप्टेंबर, १९५९ पर्यंत वाढ-विण्यांत आली असल्याचें टेक्स्टाईल कमिशनरांनीं प्रसिद्ध केलेल्या एका व्यापारी परिपत्रकांत म्हटलें आहे.

ज्यांचेकडून २८ फेब्रुवारी, १९५९ रोजीं किंवा त्यापूर्वी अर्ज आले आहेत, त्यांनाहि आपल्या अर्जांत कांहीं सुधारणा करावयाची असल्यास किंवा त्याऐवजीं नव्यानें अर्ज सादर करावयाचा असल्यास ३० सप्टेंबर, १९५९ रोजीं किंवा त्यापूर्वी अर्ज करतां येतील.

### जपानमधील पाण्याचा दिल्लींत चहा

दिल्ली येथील जपानी वकिलातीमधील १४ मार्च रोजींच्या चहा करण्याच्या समारंभासाठी क्योटो ( जपान ) येथील विहिरीचें कांहीं गॅलन पाणी विमानानें आणण्यांत आलें. हें पाणी चहाला विशेष स्वाद आणतें, अशी त्याची ख्याति आहे. चहाची पत्ती, केवस, किटल्या, पेले, इत्यादि टोकियोहून विमानानें आणण्यांत आले.

### 'इंडियन फायनॅन्स' च्या संपादकांचें निधन

'इंडियन फायनॅन्स' ह्या आर्थिक साप्ताहिकाचे संपादक श्री. सी. एस्. रंगस्वामी हे कलकत्ता येथें दि. १२ रोजीं मृत्यु पावले.

### इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लि.

वरील कंपनीस १९५८ सालीं ६,२९,२८२ रु. नफा झाला. भागदारांना ६% करमाफ डिव्हिडंड मिळेल. कंपनीजवळील रोख्यांची बाजारभावानें होणारी किंमत हिशेबांतील किंमतीपेक्षा ६.६२% ज्यास्त आहे.

### दशमान नाण्यांमुळें एस्. टी. चें नुकसान

दशमान पद्धतीच्या नाण्यांमुळें स्टेट ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशनला दरसाल ३९.२२ लक्ष रुपये तोटा सोसावा लागेल, असें मुख्य-मंत्री श्री. चव्हाण ह्यांनीं असेंब्लींत सांगितलें.

### १९५८ मधील अशुद्ध मँगेनिजचें उत्पादन

भारतांत १९५८ मध्यें १२,३०,००० मेट्रिक टन ( १२,११,००० लॉंग टन ) अशुद्ध मँगेनिजचें उत्पादन झालें असावें असा दि इंडियन ब्यूरो ऑफ माइन्स या संस्थेचा अंदाज आहे. या वर्षांतहि ओरिसा राज्यानेंच या उत्पादनांत पहिला क्रम ( ३,६०,००० मेट्रिक टन ) मिळविला आहे. त्यानंतर मुंबई ( ३,११,००० मेट्रिक टन ) मध्यप्रदेश ( २,८३,००० मेट्रिक टन ) व म्हैसूर ( २,४०,००० मेट्रिक टन ) या राज्यांचा क्रम लागतो.

दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.